पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक ३८

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ४/१२/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १२२२**

मा.श्रीमती इंदुमती फुलावरे, मा.संदिप लडकत, मा.सुनिल गोगले व मा.संतोष फरांदे यांचे दि. २६/११/२००७ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या वतीने ज्याप्रमाणे खाजगी वाड्यांमध्ये अत्यावश्यक सेवा म्हणून ड्रेनेज, लाईट, पाणी ही कामे केली जातात. त्याप्रमाणे सार्वजनिक वहीवाटीचा रस्ता म्हणून रस्त्याचेही काम करण्यात यावे. तसेच ज्या बिल्डींगकडे बिल्डर लक्ष देत नाही किंवा बिल्डींग अपूर्ण अवस्थेत सोडून गेला आहे अशा सोसायट्यांचे सार्वजनिक वहिवाटीचे रस्तेही खराब असतात त्यामुळे नागरिकांची जाण्या-येण्याची खुपच गैरसोय होत असते. अशा रस्त्यांची कामे सभासदांच्या वॉर्डस्तरीय निधीतून करण्यात यावीत.

**विषय क्र. १२२३**

मा.सौ.सीमा सरदेशपांडे व मा.सौ.उज्वला पावटेकर यांचे दि. २६/११/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ५१ न.वि.गाडगीळ शाळा, शनिवार पेठ येथे जलतरण तलाव बांधणेसाठी र.रुपये १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| यादी क्र. एस-१५, शहरात विविध ठिकाणी संरक्षण भिंत व सिमाभिंत बांधणे, पान नं. २७६, अ.क्र. ३, टिळक पूल ते ओंकाररेश्वर नदीकाठाने सिमाभिंत बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ५१ न.वि.गाडगीळ शाळा, शनिवार पेठ येथे जलतरण तलाव बांधणे | --- | १० लाख |

**विषय क्र. १२२४**

मा.सौ.नीता मंजाळकर यांचे दि. २७/११/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ५४ मधील विविध ठिकाणच्या विद्युत तारा अंडरग्राऊंड करणेसाठी र.रुपये ५.६५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, क्षेत्रिय कार्यालयाने नागरिकांच्या सहभाग योजनेअंतर्गत करावयाची कामे २००७-०८, पान नं. सीटीझेडएन-९, अ.क्र. ५४, दिप बंगला चौकामध्ये वाहतुक नियंत्रक दिवे बसविणे व अनुषंगिक कामे करणे (तरतुद र.रुपये १० लाख) | ५.६५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ५४ मधील विविध ठिकाणच्या विद्युत तारा अंडरग्राऊंड केबल टाकणे | --- | ५.६५ लाख |

**विषय क्र. १२२५**

मा.सुनिल गोगले व मा.मुरलीधर मोहोळ यांचे दि. २८/११/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १६ मधील स.नं. ९० आदर्श इंदिरानगर येथे इंटरब्लॉक बसविणेकरीता र.रुपये ६.५० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-९, शहरात विविध विकासाची कामे करणे, पान क्र. २८३, अ.क्र. २, वॉर्ड क्र. १६ विविध विकासाची कामे करणे (मान्य तरतुद र.रुपये १० लाख) | ६.५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. १६, स.नं. ९० आदर्श इंदिरानगर येथे इंटरब्लॉक बसविणे | --- | ६.५० लाख |

**विषय क्र. १२२६**

मा.लक्ष्मण आरडे व मा.सुनिल गोगले यांचे दि. २८/११/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ४९ मध्ये व्यायामशाळा बांधणेसाठी र.रुपये ७ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-२९, शहरात विविध ठिकाणी भाजी मंड्या बांधणे व विविध विकास कामे करणे, पान क्र. २८१, अ.क्र. ५, वॉर्ड क्र. ४९, २१६ मंगळवार पेठ येथे मिनी मार्केट बांधणे | ५ लाख | --- |
| ४.ग.व.नि.निधीतुन करावयाची कामे, २२४ मंगळवार पेठ येथे नविन शौचालय बांधणे व ड्रेनेज लाईन टाकणे (पान नं. २७३) | २ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. ४९ मध्ये व्यायामशाळा बांधणे | --- | ७ लाख |

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. १२२७**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ३०/६/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २७/१०/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/२८५ दि. २७/११/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. १२२८**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ७/७/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ३/११/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/२८६ दि. २७/११/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. १२२९**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १४/७/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १०/११/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/२८७ दि. २७/११/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. १२३०**

नगरसचिव कार्यालयाकडील श्री.शरद एकनाथ समेळ, हुद्या नगरसचिव (वेतनश्रेणी रुपये १०६५० ते २२१५०+मान्य भत्ते+स्पे.पे.रु. ९००/-+मोटार कार अलौन्स) यांचे रजा मुदतीत श्री.सुनिल नारायण पारखी, उपनगरसचिव (वेतनश्रेणी रुपये ६५०० ते १४७५०+मान्य भत्ते+स्पे.पे.रु. ९००/-) यांनी स्वत:चे टेबलचे काम सांभाळून नगरसचिव या पदाचे काम पाहिले असल्याने त्यांना दि. १/१०/२००७ ते २६/१०/२००७ पर्यंत अगर सदर पदाचे काम पाहतील त्या दिनांकापर्यंत मान्यता धोरणानुसार ५% विशेष वेतन देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ४९५१ दि. २३/११/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १२३१**

नगरसचिव कार्यालयाकडील श्री.कारभळ सोमा सखाराम, हुद्या ज्येष्ठ समिती लेखनिक (वेतनश्रेणी रुपये ५१५० ते ११३५०+मान्य भत्ते+स्पे.पे.रु. ९००/-) यांचे रजा मुदतीत कार्यालयीन कामकाजाच्या सोयीसाठी श्री.अभय बाबासाहेब सुर्यवंशी, समिती लेखनिक (वेतनश्रेणी रुपये ५००० ते ११११२५+मान्य भत्ते+स्पे.पे.रु. ९००/-) यांनी स्वत:च्या टेबलचे काम सांभाळून ज्येष्ठ समिती लेखनिक या पदाचे काम पाहिले असल्याने त्यांना दि. ३/१०/२००७ ते २०/१०/२००७ पर्यंत अगर सदर पदाचे काम पाहतील त्या दिनांकापर्यंत मान्यता धोरणानुसार ५% विशेष वेतन देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ४९५२ दि. २३/११/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १२३२**

श्री.हरुण गफुर सय्यद, मोटार सारथी, व्हेईकल डेपो यांना मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)(ग) नुसार मनपा सेवेतुन काढुन टाकण्यास (Removal from Municipal Service) मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/सहमआ/से/७८६ दि. २८/११/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १२३३**

पुणे महानगरपालिकेच्या येरवडा क्षेत्रिय कार्यालयाकडील (वडगांवशेरी संपर्क कार्यालय, कर आकारणी व कर संकलन विभाग) निलंबित बिगारी सेविका श्रीमती वैजयंती सुधीर बारंगुळे यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडून करण्यात आलेल्या कारवाईअंती अभियोग दाखल करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/सहमआ/से/७८९ दि. २९/११/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १२३४**

नगरसचिव कार्यालयाकडील सेवकांच्या रजा मान्य करणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ५०४८ दि. २९/११/२००७ चे पत्र.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्रं. १२३५**

सन १९९७ ते सन २००७ चे कालावधीमध्ये कात्रज, धनकवडी, आंबेगाव, कोंढवा या गावांमधील मनपा पाणीपट्टी वसूलीबाबत मा.वसंत मोरे यांचे दि. ८/५/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. २०५ दि. २२/५/२००७ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/पापु/७८७ दि. २८/११/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्रं. १२३६**

नगर रोड गुंजन चौक ते आगाखान पॅलेसपर्यंत ५०० मि.मी.व्यासाची वडगांवशेरी पंपिंगसाठी जाणारी डी.आय.लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.अरिहंत कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६९,९९,९२५/- पेक्षा २.७०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ६८,१०,९२७=०३ अधिक स्टार दराने येणारी फरकाची रक्कम पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/७७० दि. २३/११/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १२३७**

हडपसर क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्राच्या अंतर्गत विविध ठिकाणी स्लॅब कलर्व्हट बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडसपैकी ठेकेदार मे.शिंदे ॲण्ड शिंदे कन्स्ट्रक्शन कं. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८५,५२,१९४/- पेक्षा ११.७०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ७५,५१,५८७=३० पर्यंत काम करुन घेणेस अधिक सिमेंट, स्टील व डांबर यांचे बाजारभावानुसार फरक (वाढ/कपात) अदा करणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/७७६ दि. २६/११/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १२३८**

विश्रांतवाडी नाला, सेनापती बापट नाला, अलंकार नाला व त्यांचे पाणलोट क्षेत्रातील सर्व नाले, अर्धगोलाकार पाईपने नाला चॅनेलायझेशन व कंपाऊंड वॉल/रिटेनिंग वॉल बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी दुसऱ्या क्रमांकाचे ठेकेदार मे.गुडविल कन्स्ट्रक्शन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १२,९३,०४,०००/- पेक्षा १७.७% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १५,२१,९०,८०८/- पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/मलनि/७७९ दि. २८/११/२००७ चे पत्र.
(टिप :- प्रथम क्रमांकाचे ठेकेदार यांना काळ्या यादीत समाविष्ठ केले आहे.)

**विषय क्रं. १२३९**

छत्रपती शिवाजी औद्योगिक शाळा शुक्रवार पेठ येथे मजला वाढ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.व्ही.व्ही.असोसिएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९९,२४६=४० पेक्षा १३.६५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १७,२६,३४९=२७ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/७८१ दि. २८/११/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १२४०**

संगमवाडी व ढोलेपाटील क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील विविध रस्त्यांचे खडीकरण व इतर तदनुषंगिक (ग्राऊट) कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.टी ॲन्ड टी ग्रुप यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,१२,४४,४५७/- पेक्षा ८.५०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,०२,८८,६७८=१६ पर्यंत काम करुन घेणेस अधिक सिमेंट, स्टील व डांबर यांचे बाजारभावानुसार फरक (वाढ/कपात) अदा करणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/७८२ दि. २८/११/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १२४१**

सहकारनगर, बिबवेवाडी, धनकवडी, टिळकरोड, कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील पावसाळी गटार लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.डी.डी.एंटरप्राईजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २,९३,९१,३२२/- पेक्षा १५.३७% कमी) (सुधारित दराने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २,४८,७३,८७५=८१ पर्यंत काम करुन घेणेस व टेंडर कालावधीत डांबर, सिमेंट व स्टील यांचे दरात होणारी वाढ/घट त्यानुसार ठेकेदारास अदा/वसूल करणे अधिक भाववाढ सुत्रानुसार होणारी संभाव्य भाववाढ या अटीस अधिन राहून व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/७८३ दि. २८/११/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १२४२**

घोले रस्ता, कर्वे रस्ता, वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयातंर्गत येणाऱ्या विविध रस्ता रुंदीच्या जागा ताब्यात आल्यानंतर सदर रस्ता रुंदीच्या जागी तातडीने ग्राऊट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.प्रविण कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९६,६२५/- पेक्षा २०.१९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २३,९१,६०६=४१ पर्यंत काम करुन घेणेस व टेंडर कालावधीत डांबर/सिमेंट व स्टील यांचे दरात होणारी वाढ/घट त्यानुसार ठेकेदारास अदा/वसूल करणेस यांस अधिन राहून व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/७८४ दि. २८/११/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १२४३**

३० एम.एल.डी.क्षमतेचे बाणेर येथे मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे व पाच वर्षाकरीता देखभाल दुरुस्तीसह चालविणे, योग्य वाटल्यास पुढील ५ वर्षासाठी देखभाल दुरुस्तीची मुदत वाढविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.गोंडवाना इंजिनिअर्स प्रा.लि., नागपूर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,०२,००,०००/- पेक्षा ८.८९% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३१,६०,००,०००/- अधिक भाववाढ सुत्रानुसार व स्टार रेटनुसार होणाऱ्या फरकाच्या रकमेपर्यंत व २० सप्टेंबर २००७ नंतर होणाऱ्या करवाढीच्या फरकानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/मलनि/प्र/७८८ दि. २९/११/२००७ चे पत्र.

**टेंडर्स न मागविता**

**विषय क्रं. १२४४**

मनपाच्या पथ विभागासाठी सन २००७-०८ सालासाठी हॉट मिक्स प्लॅन्टकरीता डांबर, एल.डी.ओ. व डिझेल या मालाच्या खरेदीसाठी लागणारे १) डांबर - र.रुपये १४,८५,९९,३६०/- २) एल.डी.ओ. - र.रुपये ३,०६,०५,५४०/- ३) डिझेल - र.रुपये २१,११,६६५=८० अशी रक्कम अधिक प्रचलित दराने होणाऱ्या रकमेपर्यंत अगर प्रत्यक्ष जितका माल लागेल तितका हिंदुस्थान पेट्रोलियम लि., भारत पेट्रोलियम कॉर्पो.लि., इंडियन ऑईल कॉर्पो.लि. यांचेकडून त्यांच्या पत्रातील सर्व अटी स्विकारुन होणाऱ्या रकमेपर्यंत मनपा अधिनियम शेड्यूल ५(२)(२) मधील तरतूदीनुसार माल खरेदी करण्यास तसेच वेळोवेळी लागणारे ॲडव्हान्स चेकने उचल संबंधित कंपन्यांस देणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/पथ/७७२ दि. २३/११/२००७ चे पत्र.
(टिप :- वरील तिन्ही प्रकारचा माल उत्पादक सरकारी कंपन्याव्यतिरिक्त अन्यत्र मिळत नसल्याने टेंडर मागविण्यात आलेले नाहीत.)

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १२४५**

पुणे शहर व परिसर व तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका व परिसर यांच्या सभोवताली आखण्यात आलेल्या ९० मी.रुंद रस्त्यापैकी पुणे महानगरपालिका व लगतच्या परिसरातील रस्त्याअंतर्गत जागेचे भूसंपादन पुणे महानगरपालिकेच्या खर्चाने सुरु करण्यास स्थायी समितीमार्फत मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/२६१ दि. १७/७/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ३०/१०/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १२४६**

पुणे महानगरपालिका कामगार युनियनच्या सरचिटणीस श्रीमती मुक्ता मनोहर यांनी मे.अतुल पेठे यांचे प्रस्तावाप्रमाणे पुणे मनपाचे कचरा डेपो, सफाईच्या हद्दी, क्षेत्रिय कार्यालयामध्ये करण्यात येणारे सफाई व कचरा वर्गीकरणाचे काम त्या अनुषंगाने अन्य कार्यपध्दतीचे चित्रिकरण करुन त्याची ध्वनी चित्रफित केली आहे. या चित्रिकरणाद्वारे सेवक, नागरिक यांमध्ये प्रबोधन तसेच लोकसहभागात होणारी वाढ या बाबी विचारात घेवून घेण्यात आलेला निर्णय योग्य असल्याने सदर चित्रिकरणासाठी संघटनेच्या मागणीप्रमाणे अनुदान म्हणून रक्कम रुपये २,२५,०००/- (र.रुपये दोन लाख पंचवीस हजार फक्त) संकल्प स्वच्छता मोहिमेअंतर्गत वसूल करण्यात येणाऱ्या प्रशासकीय शुल्क निधीतून संघटनेस अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आरोग्य/४५० दि. १९/९/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ३०/१०/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १२४७**

मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. १६/११/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १ मध्ये विविध ठिकाणी इंटरब्लॉक बसविणे र.रुपये १० लाख तसेच वॉर्ड क्र. १ मध्ये विविध ठिकाणी ४ इंची व ६ इंची पाण्याची लाईन टाकणे र.रुपये १० लाख असे एकूण र.रुपये २० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. ए-२, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरी करणे, पान क्र. २३८, अ.क्र. २१, विश्रांतवाडी धानोरी रस्त्या वरील बॉक्स कल्व्हर्ट बांधणे व रस्ता करणे (मान्य तरतूद रु.४५ लाख) | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. १ मध्ये विविध ठिकाणी इंटरब्लॉक बसविणे | --- | १० लाख |
| २) वॉर्ड क्र.१ मध्ये विविध ठिकाणी ४ इंची व ६ इंची पाण्याची लाईन टाकणे | --- | १० लाख |

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २७/११/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १२४८**

वैकुंठ स्मशानभूमी ते काकडे हाऊस (मित्रमंडळ) पर्यंत आंबिल ओढ्यामध्ये १६०० मि.मी. व १४०० मि.मी. व्यासाची मुख्य मलवाहिनी टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.खिलारी एस.एस.यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६,२७,४५,७११=७७ पेक्षा १७.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ५,२०,१६,१९४=४२ अधिक भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/७५७ दि. २१/११/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २७/११/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १२४९**

पुणे महानगरपालिकेसाठी १५० संगणक पुरविणे **(Supply of 150 Computers to Pune Municipal Corporation)** या कामाकरिता टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्समध्ये एच.सी.एल.इन्फो सिस्टीम यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/७६६ दि. २१/११/२००७ चे पत्र.

१) र.रुपये २०,५०० प्रति नग हार्डवेअरकरिता (सर्व टॅक्स, जकात टॅक्स व सर्व करासहित) १५० संगणक खरेदी करणेस एच सी एल इन्फोसिस्टीम यांना काम देणेस

२) हार्डवेअर बरोबर ऑपरेटींग सिस्टीम **Vista Business** पुरविले तर जादा रुपये रक्कम ५,२९३/- प्रतिनग + टॅक्स + मनपा जकातप्रमाणे एच सी एल इन्फोसिस्टीम यांना काम देणेस

३) एच सी एल इन्फोसिस्टीम यांच्याशी निविदा अटीनुसार करारनामा करणेस

४) वरील खर्च खालील अर्थशिर्षकावर टाकणेस

सन २००७-२००८, आरई११एन१०३,१. मुख्य देखरेख वसुली वगैरे, ड.सांख्यिकी व संगणक कार्यालय, ३.विशेष प्रकारचे हिशोबी कामे संगणकामार्फत करुन घेणे व तदनुषंगिक कामे करणे.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २७/११/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १२५०**

पुणे मनपातर्फे शहराच्या विविध भागात किऑक्सच्या मशिन बसविण्याचे काम चालू आहेत. संपूर्ण योजना पुर्णत: राबविण्यासाठी **2 mbps wireless data link** घेणेसाठी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्समध्ये टुलीप आय टी सर्व्हिसेस लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/७६७ दि. २१/११/२००७ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिकेकरीता **Providing 2 mbps wireless data link** या कामाकरिता टुलीप आय टी सर्व्हिसेस लि. यांना १०० **Kiosk** ठिकाणी रक्कम रुपये प्रतिमहा ४,०००/- याप्रमाणे ६० महिन्यांकरीता र.रुपये २,४०,००,०००/- अदा करणेस

२) तसेच टुलीप आय टी सर्व्हिसेस लि. यांनी नमूद केलेल्या दरामध्ये किंवा त्यापेक्षा कमी दरात इतर कोणतीही संस्था काम करण्यास तयार असल्यास त्यांचेकडून काम करुन घेण्यात येईल.

३) टुलीप आय टी सर्व्हिसेस लि. यांच्याशी निविदा अटीनुसार करारनामा करणेस

४) सदर कामाकरीता टुलीप आय टी सर्व्हिसेस लि. यांना र.रुपये २,४०,००,०००/- (अक्षारी रक्कम रुपये दोन कोटी चाळीस लाख फक्त) अदा करणेस

५) वरील खर्च खालील अर्थशिर्षकावर टाकणेस

सन २००७-२००८, आरई११एन१०३,१. मुख्य देखरेख वसुली वगैरे, ड.सांख्यिकी व संगणक कार्यालय, ३.विशेष प्रकारचे हिशोबी कामे संगणकामार्फत करुन घेणे व तदनुषंगिक कामे करणे.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २७/११/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १२५१**

पुणे पेठ एरंडवणा, फा.प्लॉट नं. ९अे मनपा दवाखाना येथील (तळमजला+पहिला मजला) व्यायामशाळा व योगमंदिर बांधकाम क्षेत्रफळ २०९.११ चौ.मी.जागा ३ वर्षे मुदतीसाठी भाडेपट्टा कराराने देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या ५ निविदांपैकी सर्वात जास्त दर देणारे ठेकेदार अस्मिता प्रतिष्ठान, नंदनवन डहाणूकर कॉलनी, कोथरुड, पुणे यांनी सर्वात जास्त मासिक भाडे र.रुपये २५,०००/- देऊ केले आहे. सदरची रक्कम पुणे मनपाने निर्धारित केलेल्या मासिक भाडे र.रुपये १५,६००/- पेक्षा र.रुपये ९,४००/- ने जास्त आहे. त्यामुळे सदरची व्यायामशाळा व योगमंदिर ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी त्यांनी देऊ केलेले मासिक भाडे स्विकारुन चालविणेस देणेस तसेच मनपाचे येणारे सर्व कर सदरच्या ठेकेदाराने वेळच्यावेळी भरणेस व ताबा देणेपुर्वी ६ महिन्याचे मासिक भाडे अनामत म्हणून व ३ महिन्यांचे आगाऊ मासिक भाडे स्विकारणेस तसेच मासिक भाडे रकमेत प्रतिवर्षी

१२% वाढ करुन भाडे तत्वावर चालविणेस देणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भुजि)/७६३ दि. २१/११/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २७/११/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. १२५२**

पुणे महानगरपालिकेच्या मोठ्या व विशेष स्वरुपाच्या कामासाठी अपेक्स असोसिएटस (प्रो.श्री.मंदार ठोंबरे) यांना पूर्वगणनपत्रक रकमेच्या जास्तीत जास्त २.५% फी एवढा मुशाहिरा अदा करणेस व त्यानुसार अपेक्स असोसिएटस यांचे नाव पुणे मनपा मान्यताप्राप्त आर्किटेक्ट पॅनेलवर मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या पत्रातील १ ते ११ अटी व शर्तीस अधीन राहून नाव समाविष्ट करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भवन/७७१ दि. २३/११/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १२५३**

महिला बाल कल्याण समिती व ऑडीट उपसमिती सभा प्रसंगी चहापान व खाद्यपदार्थ मागविण्यात आले असून संबंधितांस त्याचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ५०५३ दि. २९/११/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १२५४**

मा.महापौर, मा.अध्यक्ष, स्थायी समिती, मा.सभागृह नेता यांचे कार्यालयात चहापान व खाद्यपदार्थ मागविण्यात आले तसेच मा.महापौर यांचेकडे पश्चिम बंगालचे शहर विकास मंत्री मा.अशोक भट्टाचार्य हे पुणे भेटीस आले असता त्यांच्या सन्मानार्थ भोजन व्यवस्था केल्याप्रित्यर्थ संबंधितांस त्याचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ५०५४ दि. २९/११/२००७ चे पत्र.

**शरद समेळ**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**